परिषद सभागृह सहावा मजला विस्तार इमारत येथील स्टेजवर मागील बाजूस व्हिडिओ वॉल बसविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन निर्णय क्रमांका : सभाआ-२०२६/प्र.क्र.५५/मंआस्था-२**

मंत्रालय, मुंबई-३२

दिनांक:- २२ ऑक्टोबर २०२६

**संदर्भ:**- प्रकल्प अंमलबजावणी समितीचे बैठकीचे इतिवृत्त समक्रमांक दि. २२ ऑक्टोबर, २०२६.

**प्रस्तावना,**

मंत्रालय विस्तार इमारत सहावा मजला येथील परिषद सभागृह येथे व्यासपीठाच्या मागील बाजूस समोरील प्रेक्षकांना दिसेल अशा पद्धतीने व्हिडिओ वॉल बसविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेली तांत्रिक मान्यता विचारात घेऊन व्हिडिओ वॉल व इतर संलग्न साहित्य खरेदी करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णयः**

१. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/भाग-३/उद्योग-४, दि.०१/१२/२०१६, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२१५/उद्योग-४, दि.२४ ऑगस्ट, २०१७ व उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भाखस २०२१/प्र.क्र.८/ उद्योग-४, दि.०७ मे, २०२१ मधील तरतूदीनुसार विहित कार्यपध्दतीचा अंवलब करुन मंत्रालय विस्तार इमारत, सहावा मजला येथील परिषद सभागृह येथे व्यासपीठाच्या मागील बाजूस समोरील प्रेक्षकांना दिसेल अशा पद्धतीने व्हिडिओ वॉल बसविण्यासाठी व्हिडिओ वॉल व इतर संलग्न साहित्य खरेदी करण्यास येणा-या रु १,७६,५४,१७२ (एक कोटी श्याहत्तर लाख चौपण हजार एकशे बाहत्तर फक्त ) इतक्या खर्चाच्या प्रस्तावास प्रकल्प अंमलबजावणी समितीने दि. १६ ऑक्टोबर, २०२६ रोजीच्या बैठकी अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरचा खर्च लेखाशिर्ष "मागणी क्र.ए-१ २०१३- मंत्री परिषद, (८००) इतर खर्च, (००) (०१) इतर खर्च (अनिवार्य), (२०१३००५३) १७- संगणक खर्च" या लेखाशीर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील उपलब्ध तरतुदीतून भागविण्यात यावा.

३. उपरोक्त मान्यता शासन निर्णय, वित्त विभाग क. विअप्र-२०२६/प्र.क्र.२२/२०१३/विनियम, भाग २, दिनांक ११ ऑगस्ट २०२६ अन्वये वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, भाग पहिला, उपविभाग-२. अ.क३७ नियम क्र.७६ नुसार प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात देण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६१०२२१४५३२००५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DEVIDAS SANDUJI BHAGURE

Digitally signed by DEVIDAS SANDUJI BHAGURE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=0990AE5E49835C85A735703503A82E3CD3CDDE019C8CE2FDB9C7765EF1B7C39F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2D19FEFD30011466572B4E69158C3099ADDED4CBB59D6833F72ED93F73A564DC, cn=DEVIDAS SANDUJI BHAGURE
Date: 2026.10.22 14:54:22 +05'30'

**( दे.सा. भगुरे )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. महालेखापाल, (लेखा परीक्षक/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई-४०००२०.

२. निवासी लेखा परिक्षा अधिकारी

३. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई. (सामान्य प्रशासन विभाग, मंआस्था-३(२१ रोख) शाखेमार्फत)

४. अवर सचिव तथा आहरण व संवितरण अधिकारी मंआस्था-३,सा.प्र.वी,महाराष्ट्र, मुंबई.

५. निवडनस्ती/कार्या-मंआस्था-२